आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१० जुलै २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- ऑस्ट्रेलियाचा दौरा आटोपून प्रधानमंत्री न्यूझीलंडला पोहोचले, व्यापार, गुंतवणूक, शिक्षण, तंत्रज्ञानादी क्षेत्रात सहकार्याबद्दल करणार द्विपक्षीय चर्चा

- महाराष्ट्र विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन संस्थगित, राज्य सरकारनं या अधिवेशनातून लोकांची निराशा केल्याची विरोधी पक्षांची टीका

- अयोध्येतल्या राममंदीर दान अपहाराच्या चौकशीची मागणी करणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात येत्या सोमवारी सुनावणी

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेंसेक्समध्ये ८२८, तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टी २४४ अंकांची वाढ

**<><><><><>**

तीन देशांच्या दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज न्यूझीलंडमधे पोहोचले. न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झॉन यांनी विमानतळावर त्यांचं स्वागत केलं. गेल्या ४० वर्षात प्रथमच भारताचे प्रधानमंत्री न्यूझीलंडला भेट देत असल्यानं, तिथल्या भारतीय समुदायात मोदी यांच्या आगमनाबदद्ल विशेष उत्साह होता. भारतीय समुदायानं समृद्ध सांस्कृतिक वारश्याचं रंगातदार प्रदर्शन घडवत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं आज ऑकलंडमध्ये स्वागत केलं. दोन दिवसांच्या दौऱ्यात दोन्ही देशांदरम्यान व्यापार, गुंतवणूक, शिक्षण, तंत्रज्ञान इत्यादी क्षेत्रात सहकार्याबद्दल द्विपक्षीय चर्चा होणार आहे.

न्यूझीलंडला रवाना होण्यापूर्वी प्रधानमंत्री मोदी यांनी ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानीज यांच्यासोबत मेलबर्न क्रिकेट मैदानाला भेट दिली. मोदी यांनी

यावेळी ऑस्ट्रेलियातले तरुण खेळाडू आणि क्रीडा क्षेत्रातल्या मान्यवरांशी संवाद साधला.

ऑस्ट्रेलियात आयोजित होणाऱ्या 'बिग बॅश लीग' क्रिकेट स्पर्धांचा एक हंगाम भारतात आयोजित केला जाईल, अशी घोषणा ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अल्बानीज यांनी यावेळी केली. ऑस्ट्रेलियातले विरोधी पक्ष नेते अंगस टेलर यांचीही भेट प्रधानमंत्री मोदी यांनी आज घेतली. संरक्षण, व्यापार, शिक्षण गुंतवणूक, हिंद प्रशांत महासागर क्षेत्रातलं नौवहन अशा विविध विषयांवर त्यांची चर्चा झाली. ऑस्ट्रेलियाबरोबरचे संबंध भारताच्या दृष्टीनं महत्त्वाचे असल्याचं मोदी म्हणाले.

**- - - होल्ड - बाईट- प्रधानमंत्री २ - - -**

**- <><><><><>**

महाराष्ट्र विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन आज संस्थगित झालं. अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेचा मुख्यमंत्री दे◌ेवेंद्र फडनवीस यांनी विधानसभेत उत्तर दिलं. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघातप्रकरणी सीआयडी आणि एएआयबी या दोन संस्थांकडून तपास सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. पवार यांच्या वैमानिकाबाबत काहीही संशयास्पद आढळलं नाही. विमानाच्या सर्व यंत्रणा तपासल्या असून अंतिम अहवाल पुढच्या वर्षी जानेवारीत येणं अपेक्षित आहे. तो मिळाल्यानंतरच पुढच्या तपासाची दिशा ठरवता येईल असं मुख्यमंत्री म्हणाले.

महात्मा फुले शेतकरी कर्जमाफी योजनेत मिळणारी पन्नास हजार रुपयांची रक्कम आता दोन लाखांपर्यंत देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी यावेळी केली. याशिवाय २०२५ पर्यंत असलेली कर्जमाफीची अट देखील काढून टाकल्याचं त्यांनी जाहीर केलं.

**<><><><><>**

स्थानिक स्वराज्य संस्थांना सरकारने दिलेल्या निधीचं सामाजिक आणि तांत्रिक लेखा परीक्षण करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे, अशी घोषणा

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधान परिषदेत केली. अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेला ते उत्तर देत होते. मुंबई - पुणे महामार्गावर मिसिंग लिंकची केवळ कमान कोसळली, मिसिंग लिंक पूर्ण सुरक्षित असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. तसंच या लिंकच्या खर्चात मोठी वाढ झाल्याचा आरोप त्यांनी फेटाळून लावला आणि केवळ ७ टक्के खर्च वाढ झाल्याचं ते म्हणाले. मुंबईतल्या सिद्धीविनायक मंदिरातल्या दानपेटीतल्या भ्रष्टाचार प्रकरणी चौकशीचे आदेश न देणाऱ्या तत्कालीन सरकारवर त्यांनी टीका केली.

विधान परिषदेतील सतीश चव्हाण, अरुण लाड, अभिजित वंजारी, किरण सरनाईक आणि जयंत आजगावकर या सदस्यांना आज निरोप देण्यात आला. ६ डिसेंबर २०२६ पर्यंत या सदस्यांची मुदत आहे.

यानंतर विधान परिषदेचं कामकाज संस्थागित झाल्याची घोषणा सभापती राम शिंदे यांनी आज केली. हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबर पासून नागपुरात होणार असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

राज्य सरकारनं या अधिवेशनातून लोकांची निराशा केली अशी टीका विरोधी पक्षानं अधिवेशन संपल्यावर वार्ताहर परिषदेत केली. राज्यात लोकशाही उरलेली नाही. सरकारच्या कारभारावर टीका केली तर लोकांना धमकीची भाषा वापरण्याचे प्रकार पहिल्यादांच होत असल्याचं काँग्रेस आमदार नाना पटोले म्हणाले.

या अधिवेशनात सरकारनं नागरिकांच्या प्रश्नांना न्याय दिला नाही. घाईघाईत काही विधेयक मंजूर केली असा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार भास्कर जाधव यांनी केला. सरकार लाखो कोटीच्या पुरवणी मागण्या मंजूर करून घेते. पण तो निधी खर्च करत नाही. गेल्या वर्षीही दीड - पावणे २ लाख कोटी रुपये खर्च केलेच नाही याकडे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी लक्ष वेधले.

**<><><><>**

अयोध्येतल्या श्रीरामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र न्यासातल्या देणगी अपहाराच्या चौकशीची मागणी करणाऱ्या याचिका समुहावर सर्वोच्च न्यायालयात येत्या सोमवारी सुनावणी होणार आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखाली न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही मोहना यांच्या पीठासमोर ही सुनावणी होईल. अयोध्येतल्या राम मंदिरासाठी दिलेल्या दान आणि देणग्यांच्या अपहाराच्या आरोपाची आणि इतर अनियमिततांची स्वतंत्र यंत्रणेमार्फत चौकशी करावी अशी मागणी या याचिकेमध्ये केली आहे. सध्या  उत्तरप्रदेश राज्यसरकारने नेमलेलं विशेष तपास पथक  या प्रकारणी  चौकशी करत आहे.

**<><><><>**

भू-राजकीय तणावामुळे गेले दोन दिवस भारतीय शेअर बाजारांमध्ये सुरू असलेली पडझड थांबून आज त्यात वाढ दिसून आली. सर्वच क्षेत्रात झालेल्या समभागांच्या खरेदीमुळे शेअर बाजार वधारले. मुंबई शेअर बाजाराच्या सेंसेक्समध्ये आज दिवसअखेर ८२८ अंकांची वाढ झाली आणि तो ७७ हजार ५६९ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २४४ अंकांची वाढ नोंदवत २४ हजार २०७ अंकांवर बंद झाला.

**<><><><>**

महिला क्रिकेटमध्ये भारताच्या इंग्लंड दौऱ्यातला एकमेव कसोटी सामना आज लंडनमधे लॉर्ड्स मैदानावर सुरु आहे. दुपारी साडे तीन वाजता सामन्याला सुरुवात झाली. इंग्लंडनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. भारतानं पहिल्या डावात आतापर्यंत २०० चा टप्पा पार केला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या ५ बाद २०२ धावा झाल्या होत्या.

**<><><><>**

अल्कोहोलयुक्त औषधांचा गैरवापर रोखण्याच्या दृष्टीनं केंद्रसरकारने औषधविषयक नियमांमधे बदल केले आहेत. त्यानुसार आता ३० मिलीलीटरपेक्षा जास्त मापानं विकल्या जाणाऱ्या कोणत्याही औषधात १२ टक्क्यापेक्षा जास्त एथाईल अल्कोहोल असेल तर डॉक्टरांच्या चिठ्ठीविना ते खरेदी करता येणार नाही. यापूर्वी वेलची, आलं किंवा इतर उग्र वासाच्या पदार्थापासून तयार केलेल्या औषधात अल्कोहोलची मात्रा जास्त असताना नशेसाठी त्याचा गैरवापर होत असल्याचं आढळल्यावर हा नियम दुरुस्त करण्यात आला. विविध राज्यसरकारांनीही अशी मागणी केली होती, असं केंद्रसरकारच्या अधिसूचनेत म्हटलं आहे. या औषधांच्या उत्पादनाकरता वेगळा परवाना घेणं बंधनकारक असेल.

<><><><><>

राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व आठ खासदार शरद पवार यांच्यासोबत ठामपणे उभे असून, ते कुठेही जाणार नाहीत, असं माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते अनिल देशमुख यांनी स्पष्ट केलं. ते आज नागपुरात वार्ताहर परिषदेत बोलत होते. काँग्रेससोबत जाण्याचा कोणताही प्रस्ताव किंवा चर्चा सुरू नसल्याचंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

जपानमध्ये होणाऱ्या २० व्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी २० सदस्यांच्या भारतीय महिला हॉकी संघ जाहीर झाला आहे. कर्णधार पदाची धुरा पुन्हा एकदा सलीमा टेटे हिच्याकडे दिल्याचं संघाचे मुख्य प्रशिक्षक सजॉर्ड मारिनज यांनी सांगितलं. ही स्पर्धा १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर या कालावधी जपानच्या ऐची आणि नागोया या शहरांमध्ये होणार आहेत.

<><><><><>

भूकंपाचा धक्का बसलेल्या व्हेनेझुएलाला भरीव मदत करण्याच्या उद्देशानं सुरु करण्यात आलेली अमिस्ताद मोहीम पूर्ण करून भारतीय मदत पथक आज

दिल्लीला परतलं. व्हेनेझुएलाच्या राष्ट्राध्यक्ष डेलशी रॉड्रीग्स यांनी याबाबत कृतज्ञता व्यक्त केली असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत.

परराष्ट्र मंत्रालयानं जारी केलेल्या पत्रकानुसार भारतानं या मोहिमेसाठी हवाई दलाच्या दोन विमानांसह ४१ जणांचं पथक तसंच औषधं आणि वैद्यकीय उपकरणं रवाना केली होती. या पथकात डॉक्टरांचा मोठ्या प्रमाणात समावेश होता. ही मोहीम २६ जुने पासून सुरु करण्यात आली होती.

//<><><><><>//